(5)

औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

२३३३५३६-४०,२३४८००१-०५(P.B.X.)२३३१२८१,२३३१२८३ फॅक्स (०२४०)- २३३१२१३

रेखांकन/138/2005
जा.क्र/मनपा/नरवि/नर-२ /ससंनर/106/ /२००५ दिनांक :- 8/6/05

आदेश

श्रीहरी असोसिएट्स तर्फे श्री. सचीन मधुकरराव मुळे ,
गट नंबर ८५/पैकी , इटखेडा, औरंगाबाद .

यांनी मौजे ईटखेडा , औरंगाबाद येथील सर्व्हे नंबर ८५भागश: मधील दाखल केलेल्या रेखांकनास लाल रंगाने दुरूस्ती केल्या प्रमाणे अंतिम मंजूरी खालील अटीवर देण्यात येत आहे .

०१. सर्व भूखंडाचा वापर **निवासासाठी** करण्यात यावा. अन्य कोणताही वापर महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करू नये .

०२. रेखांकनामधील प्रत्येक स्वतंत्र भूखंडाचे क्षेत्र २५० चौ.मी. पेक्षा कमी असू नेय व सेमी डिटॅच भूखंडाचेक्षेत्र १२५ चौ.मी. पेक्षा कमी असू नये . भूखडाच्या हद्दीचे दगड हलविण्यांत येवू नये .

०३. मंजूर केलेल्या रेखांकनातील कोणत्याही भूखंडाची पून्हा पोट विभागणी किंवा एकत्रिकरण करावयाचे झाल्यास महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे .

०४. रेखाकंन मधील खूली जागा विकास नियंत्रण नियमावलीस अधिन राहून कायमची खूली राहील.

०५. श्रीहरी असोसिएटस तर्फे श्री.सचिन मधुकरराव मुळे यांनी रेखांकनामधील अंतर्गत रस्ते व खुली जागा तसेच औरंगाबाद - पैठणचा डी.पी.रोड चा भाग (एकुण क्षेत्र ५३७१.०४३ चौ.मी.) चे हस्तांतर महानगरपालिकेस दुय्यम निबंधक (नोंदणी) यांच्या कार्यालयात नोंदणी क्रमांक २१३५/२००५ दिनांक २१/०५/२००५ चे रीलीकंवीश डीड (परिमोचन पत्रा द्वारे)अन्वये करून दिलेले आहे . हे रस्ते सार्वजनिक रस्ते म्हणुन वापरात राहतील .

०६. भूखंडामध्ये बांधकाम नियमाप्रमाणे या कार्यालयाची परवानगी घेऊन करण्यात यावे .तसेच करण्यात येणारे बाधंकाम उपविधी (बिल्डीग बाय लॉज) व विकास नियंत्रण नियमावली (डेव्हलपमेंट कंट्रोल रूल) च्या अनुषंगाने करावे लागेल .

०७. भविष्यात रहदारीच्या दृष्टीकोनातून आणखी रस्ता रूंदीसाठी जागेची गरज भासल्यास ती भूमिसंपादन कायदा आणि महाराष्ट्र प्रोदशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार सपांदन करण्यांत येईल .

०९. प्रत्यक्ष जागेवरील भूखंडाचा नकाशा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख औरंगाबाद यांच्याकडुन भूखंड आखणी (Demarcation) करून घेण्यात आली आहे .

०९. भूखंडातून महानगरपालिकेच्या मालकीची जल वाहिनी किंवा भूमिगत गटार गेलेली असेल तर ती स्वखर्चाने स्थलांतर करून घ्यावी लागेल. अशा जलवाहिनी भूमिगत गटारावर कोणत्याही प्रकारचे बांधाकम करता येणार नाही .

कृपया मागे पहा

१०. नैसर्गिकरित्या वाहणारा पाण्याचा प्रवाह जर भूखंडातून जात असेल तर भूखंडाच्या एका बाजूने भूमिगत पाईप लाईन ,गटारासाठी मार्ग मोकळा करून द्यावा लागेल त्यासाठी कोणत्याही प्रकाराचा मोबदला दिला जाणार नाही . हे काम महानगरपालिकेच्या संबधित विभागाचे मार्गदर्शनानुसार करावे लागेल .

११. सदर रेखांकनात एकूण रूपये ५७६२५४/- आकारण्यात आलेला विकास खर्च १०० % रक्कम चा. क्र. ४०२१ दिनांक २५/०५/२००५ नुसार १ ते २४ भूखंडासाठी जमा करण्यात आली आहे.

१२. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (दुरूस्ती)अधिनियम १९९२ चे तरतुदीनूसार रहिवास वापरासाठी रूपये ४० /- प्रति चौ.मी. प्रमाणे रूपये ३,२५,१७०/- १००% जमिन विकास शुल्क चा.क्र. ०४००७ द्वारे दिनांक २/०५/२००५ नुसार १ ते २५ क्रमांक प्लॉट चा १०० % भरणा केलेले आहे .

१३. सदर रेखांकनात महानगरपालिकेची सदर भागातील पाणी पुरवठा व जलनि:सारण योजना पूर्ण झाल्या खेरीज सदर भूखंडाना पाणी पूरवठा व जलनि:सारणाची व्यवस्था करण्यात येणार नाही.

१४. मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडुन सदर रेखांकनास महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषि परवानगी बांधकाम प्रस्ताव दाखल करण्यापूर्वी प्राप्त करावा .

१५. सदरील रेखांकनात एकुण १ ते २५ असे भूखंड आहेत . त्यापैकी १ ते २४ भूखंडाचे विकास खर्च रक्कम १०० % भरणा झाला असून भूखंड क्रमांक २५ चा विकास खर्च रक्कम भरणा बाकी असल्यामुळे तुर्त १ ते २४ या भूखंडाना अंतिम मंजुरी देण्यात येत आहे . भूखंड क्रमांक २५ चा विकास खर्च भरणा झाल्यावर सदरील भूखंड क्रमांक २५ ला अंतीम मंजुरी देण्यात येईल . तुर्त सदर भूखंड क्रमांक २५ नामंजुर करण्यात येत आहे .

१६. भूखंड क्रमांक ५,६, व १९, २० या भूखंडावरून उच्च दाब वाहिणी जात असल्यामुळे सदरील लाईन चे स्थांलांतर झाल्याशिवास वरील भूखंडावर बांधकाम परवानगी देय होणार नाही .

सहाय्यक संचालक नगर रचना,
महानगरपालिका, औरंगाबाद
8/6/05

प्रत:-

०३. श्रीहरी असोसिएट् स तर्फे श्री. सचिन मधुकराव मुळे .

०४. मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्तवीसाठी व योग्य त्याकार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित.

०३. शहर अभियंता ,महानगरपालिका, औरंगाबाद यांना सदरची खुली जागा संरक्षणास्तव आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित ..

०४. कार्यकारी अभियंता (पा.पु)महानगरपालिका, औरंगाबाद यांना माहितीस्तव.

०५. कार्यकारी अभियंता (ज.नि.व विद्युत)महानगरपालिका, औरंगाबाद यांना माहितीस्तव.

०५. मालमत्ता अधिकारी ,महानगरपालिका, औरंगाबाद यांना अंतर्गत रस्ते व पोच रस्ता नोंदणीकृत दस्ताने हस्तांतरीत झालेली आहे ७/१२ वर फेर क्रमांक ६०२ नुसार झालेली आहे. सुलभ संदर्भाकरीता मंजूर रेखांकन नकाशा सोबत नोंदणीकृत दस्ताची प्रत ७/१२ ही सादर करण्यात येत आहे. सदरची खुली जागा संरक्षणास्तव आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

०६ मुळ संचिकेसाठी.